# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २७ डिसेंबर २०२४


## सुखापुरी हायस्कूल सुखापुरी येथील २००४-०५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन पार पडले



**सुखापुरी (डॉ. रामेश्वर पाटील) :** हायस्कूल सुखापुरी येथील २००४-५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन पार पडले, , याप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री डॉक्टर निसार देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणेपदी संस्थेचे सचिव श्री लंगोटे सर, माजी मुख्याध्यापक मदन देशमुख सर, मुख्याध्यापक श्री वाघमारे सर, श्री कुलदीप रुघे सर, श्री पारडकर सर, श्री डी एन आवचार सर, श्री एस जे मिसाळ सर, श्री सर्जेराव पटेकर सर, श्री चौधरी सर, श्री गणेश लंगोटे सर, श्री संतोष राखुंडे, श्री बी के राखुंडे सर, श्री राऊत सर आदींची उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमात २००४-५ बॅच चे विद्यार्थी तब्बल वीस वर्षानंतर आपल्या दहावीपर्यंतच्या शाळेत पुन्हा एकदा एकत्र जमले होते, याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील आठवणींना उजाळा दिला, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रामेश्वर पाटील यांनी तर आभार प्रदर्शन अनिरुद्ध राखुंडे यांनी केले.

तब्बल वीस वर्षानंतरही आपल्या बॅचच्या स्नेहसंमेलनासाठी आलेल्या माजी विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय होती,उपस्थित विद्यार्थिनींमध्ये सुवर्णा अवचार-पाईकराव, सुवर्णा काळे- जाधव, जयश्री शिंदे- सोळुंके, पवित्रा गायकवाड, मंजू खर्चे, मीरा शिंदे-काकडे,वंदना खरात, शीतल थोरात,रुख्मिणी शिंदे, सौमित्रा शिंदे,जिजाबाई गुंडे - ढेबे,अंजना राखुंडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणपत गवारे,भगवान गव्हाणे, संभाजी रक्ताटे, लक्ष्मण मते, मारोती मते, शिवाजी गव्हाणे पाटील, भरत गव्हाणे,संतोष यवले, अनिरुद्ध राखुंडे, नितीन मोताळे, संतोष गाडेकर, विठ्ठल लंगोटे,दीपक पटेकर, दिलीप परमेश्वर, ज्ञानेश्वर खांडे, कृष्णा काळे,गणेश नरवाडे, दिनेश राठोड, राजू राठोड,राजकुमार देशमुख, चक्रधर जाधव, गणेश पटेकर, श्रीराम घोडके, नाथा गायकवाड, विनायक गायकवाड, कृष्णा गाडे, नितीन गायकवाड , ज्ञानेश्वर गुंडे आदींनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दलित बहुजनांचा तिरस्कार करतात : पँथर दीपक केदार

**परभणी** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील दलित व बहुजनांचा तिरस्कार करतात का? असा सवाल पँथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार यांनी केला आहे. दीपक केदार यांनी गुरुवारी परभणी हिंसाचारातील पीडितांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्यांनी वरील सवाल केला.

देवेंद्र फडणवीस यांना दलित बहुजनांचा तिरस्कार आहे का? कारण मागील 10 वर्षांत त्यांनी एकदाही दलित अत्याचार झालेल्या ठिकाणी भेट दिली नाही. ते राज्याचे गृहमंत्री होतात तेव्हाच राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडून दलितांवर हल्ले का होतात? असे ते म्हणाले.

परभणी प्रकरण हे रमाबाई आंबेडकरनगर येथील गोळीबारासारखे आहे. मनोहर कदमच्या भूमिकेत अशोक घोरबांड होता. हे जवळपास 10 जणांच्या हत्याकांडाचे षडयंत्र असावे. मनोहर कदमला शिक्षा झाली असती तर हा घोरबांड निर्माण झाला नसता. या घोरबांडला कर्मठ हिंदुत्त्ववादी संघटनांनी प्रशिक्षण दिल्याचा आम्हाला संशय आहे. त्याची जातीयवादी वृत्ती ही एखाद्या संघटनेशी जोडल्यासारखी असल्यामुळे त्याची चौकशी झाली पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.






## आज सर्वच क्षेत्रात मूली आघाडीवर आहेत भावी काळात हा देश मुलीच चालवतील - प्राचार्य दिलीप गरुड

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** आज सर्वच क्षेत्रात मूली आघाडीवर आहेत भावी काळात हा देश मुलीच चालवतील असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.विद्यार्थ्यांनी सकारात्मक राहून प्रसन्न व आनंदी चेहऱ्याने हसत समस्यांना सामोरे जावे व सातत्यपूर्ण परिश्रमातून यश मिळवावे असे आवाहन आदर्श महाविद्यालयाचे डॉ. दिलीप गरुड यांनी व्यक्त केले.

मायक्रोकॉम कॉम्प्युटर एज्युकेशन या संस्थेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. दिपक पोफळे, मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला, कौन बनेगा करोडपती फेम मुकुंद मोरे, संजय बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. दिपक पोफळे म्हणाले की, उच्च ध्येय बाळगून ध्येय प्राप्तीसाठी मेहनत, सातत्य, वेळेचे नियोजन, सकारात्मक विचार व दुरदृष्टी ठेवून मूल्ला सरांनी नोकरीच्या मागे न लागता उमरगा येथे सगणंक शिक्षणाची सोय करून हजारो विद्यार्थी घडविले, सोबतच या समाजाचे आपण काही देणे लागतो ही जाण ठेवून, स्वतःच्या यशात मशगूल न रहाता अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला.

रोटरीच्या माध्यमातून त्यांनी वृक्ष लागवड, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणीक मदत, करोना काळात शेकडो रुग्णांना अन्नदान अशा सामाजिक उपक्रमातून त्यांनी केलेलं कार्य उल्लेखनीय आहे.

त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी यावेळीकेले.कौन बनेगा करोडपतीच्या हॉटशिट पर्यंत जाऊन यश मिळविलेले जगदाळवाडी येथील शेतकरी मुकुंद मोरे व संजय बिराजदार यांची भाषणे झाली. यावेळी विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पुजा वाले, सुमय्या जमादार व रमजा मोमीन यांचा संस्थेतील उत्कृष्ठ योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. मायक्रोकॉम संस्थेच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहीत्याचे वाटप करण्यात आले. पुजा माने यांनी सुत्रसंचलन केले.

तर सुमय्या जमादार यांनी आभार मानले. इरफान मुल्ला, माजीद बागवान, ओंकार इसराजी, अस्लम मुल्ला, रऊफ मुरशद यांनी यासाठी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

